MHKO070013492006

**नियमित दरखास्त क्र.६/२००७ मधील निशाणी क्र.२५ वर आदेश**
**(दुधू खवाटे मयत तर्फे वारस वगैरे –विरुध्द – सातू चुडाप्पा मयत तर्फे वारस वगैरे)**

जाबदार क्र.१अ१, १अ२, १ब, १ड आणि १इ यांनी प्रस्तुतच्या अर्जान्वये त्यांच्या विरुध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून जाबदार यांचे म्हणणे दाखल करून घेण्याकरीता विनंती केली आहे.

**०२.** जाबदार यांचे कथन असे की, प्रस्तुतची दरखास्त दरखास्तदार यांनी जाबदार यांच्याविरुध्द रे.दि.क.नं.१५७/१९७८ या कामी दि.१६/११/२००५ रोजी झाले हुकूमनामेप्रमाणे दावा मिळकतीचे उलट खरेदीपत्र करुन मिळणेसाठी व कब्जासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत जाबदार यांच्याविरुध्द ते मुळ दरखास्तकामी हजर न झाल्याने एकतर्फा आदेश केलेला आहे. जाबदार क्र.१अ२ अमित अजित चुडाप्पा हे दावा दाखल तारखेस अज्ञान होते, ते सज्ञान झाल्यानंतर मुळ दावेचे कामी दुरुस्ती करुन त्यांना कोणत्याही प्रकारचे दावेचे समन्स काढण्यात आलेले नव्हते व नाहीत. त्यामुळे जाबदार क्र.१अ२ यांना रे.दि.क. १५७/१९७८ याकामी झालेल्या निर्णयाबाबत काहीही माहिती नव्हती व ना ही व सदर हुकूमनामा प्रस्तुत जाबदार क्र. १अ२ यांच्यावर बंधनकारक नाही. जाबदार क्र.१अ२ यांना सदरकामी नि.क्र.१४ ड प्रमाणे प्रत्यंतरणपत्राच्या ड्राफटची नोटीस लागू झाल्यावर या कामाबाबत व मुळ दावेबाबत समजून आले. त्यानंतर जाबदार क्र.१अ२ यांनी मुळ दावेतील कागदपत्रांच्या सही शिक्क्याच्या नक्कला मिळवून, माहिती घेवून, सदर जाबदार क्र.१अ२ व

इतर जाबदार यांनी मुळ रे.दि.क.नं.१५७/१९७८ कामी झाले आदेशाविरुध्द अपील दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ होवून अपील दाखल करण्याकरीता किरकोळ अर्ज क्र.१/२०२० हा दाखल केलेला असून तो अदयाप प्रलंबीत आहे. सदर अर्जाच्या नोटीसा दरखास्तदार यांना लागू झालेल्या आहेत. त्यामुळे खरी वस्तुस्थिती रेकॉर्डवर येणे आवश्यक व न्यायाचे आहे.

**०३.** जाबदार पुढे असे कथन करतात की जाबदार क्र.१अ१, १ब व १इ हे सर्वजण अडाणी व अशिक्षीत असून त्यांना कायदयाचे ज्ञान नाही. त्यामुळे नोटीसा लागू झाल्यानंतर हजर होवून म्हणणे मांडण्याचे असते याची माहिती नसल्याने ते वेळीच हजर होवून त्यांचे म्हणणे देवू शकले नाहीत. सदर काम न चालवणे अगर लांबवणे असे मुळीच घडलेले नाही. सदर कामाचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी व सत्यस्थिती रेकॉर्डवर येण्यासाठी प्रस्तुत जाबदार यांच्याविरुध्द झालेल्या एक्सपार्टी आदेश सेट असाईड करण्यात येवून जाबदार यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तुत जाबदार यांनी केली आहे.

**०४.** दरखास्तदार यांनी त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जावरच दाखल केले असून त्यांना प्रस्तुतचा अर्ज मान्य व कबुल नसल्याचे कथन करुन पुढे असे कथन केले की अर्जातील नमूद कारणे खोटी व लबाडीची आहेत. दरखास्तीस म्हणणे देणेकरीता विलंब का झाला याचे कोणतेही कारण नमूद केलेले नाही. जाबदार यांना नि.क्र.६ प्रमाणे ता.१७/०४/२००७ रोजी नोटीसा प्राप्त होवून त्यानंतर बरीच संधी दिल्यानंतर त्यांच्याविरुध्द एक्सपार्टीचा हुकूम झालेला आहे. नोटीसा घेतल्यानंतर जाबदार यांना दरखास्तीची पूर्णपणे कल्पना आलेली होती त्यामुळे त्यांना मुदतीत म्हणणे दाखल करणेस कोणतीच अडचण नव्हती. नोटीस लागू झाल्यानंतर

पासून कित्येक वर्षांनी जाबदार हे म्हणणे दाखल करत असून एक्सपार्टी हुकूम रद्द करणेकरीता कोणतेही संयुक्तीक कारण नमूद नाही. सदरचे प्रकरण २००७ चे जुने प्रकरण असल्याने केवळ काम लांबवण्याच्या उद्देशाने मुद्दामहून स्वार्थ हेतूने मुदतीत म्हणणे दाखल केलेले नाही. करीता जाबदार यांचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती दरखास्तदार यांनी केली आहे.

**०५.** उभयपक्षांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की दरखास्तदार यांनी प्रस्तुतची दरखास्त ही रे.दि.क.नं.१५७/१९७८ या कामी दि.१६/११/२००५ रोजी झालेल्या हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकतीचे उलट खरेदीपत्र करुन मिळण्यासाठी व कब्जासाठी दाखल केलेली आहे. प्रस्तुतची दरखास्त दाखल केल्यानंतर निशाणी क्र.६, ७ व १५ वरील नोटीसींद्वारे जाबदार क्र.१अ१, १अ२, १ब, १ड आणि १इ यांना नोटीस बजावणी झालेल्या आहेत व त्यानंतर दि.१०/१२/२०१० रोजी त्यांच्याविरुध्द दरखास्त एकतर्फा चालवण्याचा हुकूम निशाणी क्र.१ वर पारीत करण्यात आलेला आहे. नोटीस बजावणी होवून ९ वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला असून दरम्यानच्या कालावधीत हजर होवून म्हणणे मांडता आले नसलेबाबत दिलेले कारण हे संयुक्तीक नाही. जाबदार यांना नोटीसा प्राप्त झाल्याबाबत मान्य आहेत. परंतू ते अडाणी व अशिक्षीत असून त्यांना कायदयाचे ज्ञान नसल्याने ते कामात हजर झाले नाहीत हे त्यांनी दिलेले कारण विश्वासार्ह संयुक्तीक नाही. तसेच जाबदार यांनी कथन केले आहे की प्रस्तुत कामी निशाणी क्र.१४/ड प्रमाणे प्रत्यंतरपत्राच्या ड्राफटची नोटीस जाबदार क्र.१अ२ यांना मिळाल्यानंतर मुळ दावा व प्रस्तुतच्या प्रकरणाबाबत समजले व त्यांनी मूळ दाव्याच्या निकालाविरुध्द झालेल्या विलंबाबाबत विलंब माफीचा अर्ज दाखल केला. जाबदार यांनी ड्राफटची नोटीस त्यांना कधी लागू झाली किंवा विलंब माफीचा अर्ज मंजूर झाला किंवा कसे

याबाबत कोणताही कागद पटलावर दाखल केलेला नाही. यावरुन असे दिसते की मूळ दाव्याचा निकाल लागून १० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाल्यानंतर त्यांनी मुळ दाव्याविरुध्द अपील दाखल केले आहे. जाबदार यांनी नमूद केलेली कारणे संयुक्तीक नसून त्यांचा अर्ज मंजूर करण्याकरीता पूरेशी व ठोस नाहीत. सदर प्रकरणातील वस्तुस्थिती व स्वरूप पाहता, अर्ज नामंजुर होण्यास पात्र ठरतो. करिता खालील आदेश–

**आदेश**

प्रस्तुत अर्ज (निशाणी क्र.२५) नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by ROHINI ASHOK JADHAV
Date: 2023.02.04 18:41:01 +0530

( **रोहिनी अ. जाधव** )

दिनांक : ०४/०२/२०२३ २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
जयसिंगपूर. जयसिंगपूर.